<u>**नियमित दरखास्त क्र. १७/२०१२ मधील निशाण ६७ वरील आदेश**</u>

०१. सदरील अर्ज सामनेवाला क्र. १क व १ड यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'एकतर्फा' चा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे. सामनेवाला क्र. १क व १ड यांचे असे म्हणणे आहे की त्यांच्याविरोधात दि. ०६/०१/२०१६ रोजी एकतर्फा आदेश झाल्याचे दिसून येते. परंतु प्रत्यक्षात सदर सामनेवाला हे फार पुर्वी या दरखास्तीच्या प्रोसिडींगमध्ये हजर झालेले आहेत. त्याचे वकीलपत्र सुध्दा या प्रकरणी दाखल आहे. त्यामुळे सामनेवाला क्र. १क व १ड यांच्या विरोधात दि. ०६/०१/२०१६ रोजी झालेला एकतर्फा आदेश हा नजर चुकीने झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब सदरचा एकतर्फा आदेश रद्द करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

०२. सदरील अर्जास दरखास्तदार याने हरकत घेतली आहे व त्यांचे असे कथन आहे की सदर कामी सामनेवाला क्र. १ क व १ड यांना बजावणी झाल्यानंतर त्यांनी न्यायालयात उपस्थिती न दर्शविल्याने त्यांच्या विरुध्द योग्यरित्या एकतर्फा आदेश झालेला आहे. तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा .

०३. सदर प्रकरणाचे अवलोकन करता दि. ०६/०१/२०१६ रोजी माझ्या पुर्वाधिका—यांनी सामनेवाला क्र. १क व १ड यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. सदर प्रकरणाच्या अवलोकनावरुन असे दिसून येते की नि. ३६ अन्वये सामनेवाला क्र. १क व १ड तर्फे वकीलपत्र दाखल आहे. प्रतिवादी क्र. १क व १ड यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश दि. ०६/०१/२०१६ रोजी झालेला आहे. परंतु, दि. ०५/०५/२०१४ रोजी नि. ३९ अन्वये प्रतिवादी क्र. १ क व १ड यांनी दरखास्तीवर त्यांचे म्हणणे दाखल केल्याचे दिसून येते, म्हणजेच त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश होण्याच्या आधीच त्यांचे म्हणणे पटलावर दाखल आहे. माझ्या पुर्वाधिका—यांनी यांनी दि. ०६/०१/२०१६ रोजी प्रतिवादी क्र. १क व १ड यांच्याविरुध्द केलेला एकतर्फा आदेश हा नजरचुकीने झाल्याचे प्रतिवादी क्र. १ क व १ड यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. सदरील चुक ही तांत्रिक आहे. तांत्रिक गोष्टी किंवा चुका या न्यायादानाच्या कामात अडथळा ठरता कामा नये ही गोष्ट सर्वश्रुत आहे. सबब वर नमूद कारणास्तव प्रतिवादी क्र. १ क व १ड यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

<u>**आदेश**</u>

१. अर्ज नि.क्र. ६७ मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १क व १ड यांच्याविरुध्दचा झालेला 'एकतर्फा' चा आदेश रद्द करण्यात येतो.

सही/—

दिनांक :— ०७/१२/२०१६

(एस.एच.पन्हाळे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण